नगरसचिव

**पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता**

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. १७**

**मार्च २०२०**

**पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक १७ मार्च २०२० रोजी दुपारी ३:००(तीन) वाजता हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**'' नियुक्त्या ''**

**विषय क्र.११०२**

'' महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये तसेच मनपा सभा कामकाज नियमावलीतील नियम क्र. ६४ व ६८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे खालील चार विशेष समितीवर प्रत्येकी १३ मा.सभासदांच्या महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ३१ (अ) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे मनपातील पक्षांच्या किंवा गटाच्या संख्या बळाच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देवून नियुक्त्या करणे.''

**१) विधी समिती  २) शहर सुधारणा समिती  ३) महिला बाल कल्याण समिती  ४) क्रीडा समिती**

**( टिप – महिला बाल कल्याण समिती वरील एकूण सभासदांच्या ७५% सभासदत्व महिला सभासदांना द्यावयाचे आहे.)**

**विषय क्र.११०३**

पुणे शहरासाठी शासन स्तरावरील मा.उपविभागीय स्तरीय वनहक्क समिती गठीत करणेसाठी तीन सदस्यांची नावे नामनिर्देशित करून मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पापु/९०७, दि.३१/१२/२०१९ चे पत्र.

**(टीप:– वनहक्क कायदा नियम ५(ग) व शासन निर्णय क्र.वहका–२०१५/प्र.क्र.६१/का–१४ दिनांक ८ सप्टेंबर २०१५ मधील ३.५ नुसार मा. मुख्य सभेने तीन सदस्यांची नामनिर्देशन करणे आवश्यक आहे. त्यापैकी किमान दोन अनुसूचित जमातीचे असावेत किंवा आदिम जमातीतील असावेत. आणि जेथे अनुसूचित जमाती नसतील तेथे दोन सदस्य हे प्राधान्याने इतर पारंपारिक वननिवासी असावेत आणि एक सदस्य महिला असावी अशी तरतूद नमुद आहे.)**

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे मार्च २०२० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९४५, दि.१८/२/२०२० चा झाला आहे.)**

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**– स्थायी समितीचे ठराव –**

**विषय क्र.११०४**

संदर्भ – १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विदयुत/९६२ दि. १४/१/२०२० चे पत्र
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२०५२,दि.१४/१/२०२०
३) मनपा ठराव क्र.८६५,दि.२०/१/२०२०

-----

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

म.रा.वि.वि.कं. लि. यांना विद्युत विभागाची वीज देयकांची मासिक बिले अदा करणेसाठी र.रु. ९ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (प्रकल्प) विभाग, पुणे महानगरपालिका, २०१९-२० भांडवली कामे क्र टी-२ शहरामधील चौकांची सुधारणा/विकास कामे करणे, वाहतुक सुधारण्यासाठी विविध विकास कामे करणे. (Electronic Bus GCC Model)/विकत/PPPइत्यादी धर्तीवर बस उपलब्ध करून देणे. CE20B102/T2-21 | ९ कोटी | ---- |

नविन सुचविलेले काम-
सन २०१९-२० चे अंदाजपत्रक मुख्य अभियंता (विद्युत) विभाग पुणे महानगरपालिका, ग-१पथावरील दिवाबत्ती (विद्युत),४.पथावरील दिवे विज खर्च पान क्र.६४, RE20C103 ---- ९ कोटी

**(टिप - सदर विषयाचा विचार माहे मार्च २०२० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९४९, दि.१८/२/२०२० चा झाला आहे.)**

**विषय क्र.११०५**

संदर्भ - १) जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,महसूल शाखा क्र.पमह/१२४०/९९ दि.१६/०८/१९९९ चे आदेश
२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांचे पत्र आ.क्र.४०२६ दि.१०/७/२०१८
३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/५८१ दि.८.१०.२०१८ चे पत्र.
४) मा.शहर सुधारणा समितीचा ठराव क्र.३९१ दि.२५/१/२०१९
५) मा.सुनिल कांबळे व मा.मारुती तुपे यांची दि.२७/२/२०१९ ची उपसूचना
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६६९,दि.२७/२/२०१९

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

बालेवाडी स.नं.२६/१ अ पैकी ४ हे.१२ आर क्षेत्राचा वापर मल्टी मॉडेल ट्रान्झिट हबचा प्रकल्प उभारणेस मा.महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळेल या भरवशावर सदर क्षेत्र मल्टीमॉडेल ट्रान्झिट हब उभारणेसाठी पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांना हस्तांतरीत करण्यास तसेच ज्यांच्या जागा या प्रकल्पासाठी घेत आहोत त्या संबंधितांना पर्यायी जागा देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप - सदर विषयाचा विचार माहे मार्च २०२० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९१८, दि.१८/२/२०२० चा झाला आहे.)**

**विषय क्र.११०६**

संदर्भ - १) क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दि.१३/१२/२०१८ रोजीचे पत्र.
२) क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दि.२९/१२/२०१८ रोजीचे पत्र.
३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/औंध-बाणेर/१४३६,दि.२२/२/२०१९चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६७९,दि.२७/२/२०१९

----

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

खेलो इंडिया युथ गेम्स २०१९ अंतर्गत शिवछत्रपती क्रीडा संकुल,म्हाळुंगे-बालेवाडी,पुणे येथे स्वच्छतेसाठी मनुष्यबळ व साधनसामुग्री पुरविणे या करण्यात आलेल्या कामांसाठी व त्याप्रमाणे खर्च करणेस MMC Act १९४९ चे कलम ८९ नुसार पश्चात मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप - सदर विषयाचा विचार माहे मार्च २०२० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.९२०, दि.१८/२/२०२० चा झाला आहे.)**

**विषय क्र.११०७**

संदर्भ - १) मा.हेमंत रासने व मा.राजेंद्र शिळीमकर यांचे दि. १३/११/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १४७९ दि. १३/११/२०१९
३) मा.मुख्य सभा ठराव क्र. ६७९ दि.१९/१२/२०१९
४) मा.सुनिल कांबळे, आमदार, मा.योगेश मुळीक व मा.दिलिप वेडेपाटील यांचे दि. ४/२/२०२० चे फेरविचाराचे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.२१७३,दि.४/२/२०२०

----

मा.स्थायी समिती ठराव क्र. १४७९ दि. १३/११/२०१९ चा फेरविचार करण्यात आला.

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

आद्य क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे यांचे संगमवाडी येथे समाधीस्थळ उभारणेचे कामी जागा

भूसंपादनासाठी र.रु. २० कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास व मा.मुख्य सभा ठराव क्र. ६७९ दि.१९/१२/२०१९ चा दुरुस्त करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, | | |
| १) १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. १४, शहरामध्ये सायकल ट्रॅक विकसित करणे, (यादी क्र. ए-१७), पान क्र. १९८, अ.क्र. १, एकात्मिक सायकल योजना कार्यान्वित करणे (बजेट कोड नं. सीई२०अे१२६४/ए१७-२) | १० कोटी | --- |
| २) १०.ख.वाहतूक नियंत्रण, पान क्र. १००, अ.क्र. २, शहरामधील चौकांची सुधारणा/विकास कामे करणे, वाहतुक सुधारण्यासाठी विविध विकास कामे करणे, (यादी क्र.टी-२), पान क्र.२००, अ.क्र.१, Electronic Bus (GCC Mode)/ विकत/ PPP इत्यादी धर्तीवर बस उपलब्ध करुन देणे (बजेट कोड नं.सीई२०B१०२/टी२-२१) | १० कोटी | --- |
| नवीन सुचविलेले काम- | | |
| आद्य क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे यांचे संगमवाडी येथे समाधीस्थळ उभारणेचे कामी जागा भूसंपादनासाठी | --- | २० कोटी |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी दुरुस्त ठरावाची कार्यवाही करावी.

याबाबत यापुर्वी झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १४७९ दि. १३/११/२०१९ चा दुरुस्त करण्यात येत आहे

**विषय क्र.११०८**

संदर्भ - १) मा.दिपक पोटे यांचे दि.१८/२/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२७४,दि.२७/२/२०२०

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.१३ अ मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १९.भाजी मंडया व पशुवधगृहे, पान क्र. ११४, अ.क्र. ७, शहरामध्ये भाजी मंडई, ओटा मार्केट, मटन मार्केट बांधणे, भाजी मंडयामध्ये विकास कामे करणे (यादी एसजे-२९), पान क्र. २६२, अ.क्र. ६, प्रभाग क्र. १३ अ मध्ये आळेकर भाजी मंडई नव्याने सुशोभिकरण करणे. | ५ लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम - | | |
| प्रभाग क्र.१३ अ मध्ये विविध विकास कामे करणे | --- | ५ लाख |

**विषय क्र.११०९**

संदर्भ - १) मा.उमेश गायकवाड यांचे दि.२७/२/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२८९,दि.२७/२/२०२०

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.२१ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. १०२, अ.क्र.७, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम बांधणे, क्रीडांगणे, मैदाने विकसित करणे, पोहोण्याचे तलाव बांधणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे-२४), पान क्र. २५७ अ.क्र.५०, प्रभाग क्र.२१ ड मध्ये कै.बाळासाहेब कवडे क्रीडांगण येथे विविध विकासकामे करणे. | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे- | | |
| १)प्रभाग क्र.२१ ड मध्ये उल्हास नगर येथील कपीला डेअरी शेजारी अविष्कार क्रिडा सामाजिक हॉलचे नुतनीकरण करणे. | --- | १० लाख |

| | | |
|---|---|---|
| २) प्रभाग क्र.२१ ड मध्ये कोरेगाव पार्क दरोडे मळा अस्तित्वातील समाज मंदिराची विविध विकासकामे करणे | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.२१ ड मध्ये कोरेगाव पार्क, संत गाडगे महाराज येथील अस्तित्वातील बुध्द विहाराचे नुतनीकरण करणे | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.२१ ड मध्ये कोरेगाव पार्क, बर्निंग घाट येथील वसाहती मधील रामदेव बाबा समाज मंदिराचे स्थापत्यविषयक कामे करणे. | --- | १० लाख |
| ५) प्रभाग क्र.२१ ड मध्ये उल्हास नगर येथील सामाजिक हॉलचे उर्वरीत स्थापत्यविषयक कामे करणे. | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवाशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**<u>विषय क्र.१११०</u>**

संदर्भ – १) मा.सौ.सरस्वती शेंडगे, उपमहापौर यांचे दि.२७/२/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२९०,दि.२७/२/२०२०

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. २९ अ मधील पर्वती दर्शन भागामध्ये रस्ता कॉंक्रीट करणेसाठी र.रुपये १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०२, अ.क्र. ७, शहरात भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे-१०), पान क्र.२४२, अ.क्र.२३४, प्रभाग क्र. २९ अ मध्ये सारसबाग येथे दक्षिणेस नवीन गेट व पायरी तयार करणे | १० लाख | ---- |
| **नविन सुचविलेले काम-** | | |
| प्रभाग क्र. २९ अ मधील पर्वती दर्शन भागामध्ये रस्ता कॉंक्रीट करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**<u>विषय क्र.११११</u>**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रीडा/१०५६,दि. ६/२/२०२० चे पत्र
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २७२ दि.१४/२/२०२०
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३०४,दि.२७/२/२०२०

**विषय –** पुणे पेठ हडपसर स.नं.१६४ (पार्ट) येथील विठ्ठलराव तुपे क्रीडा संकुल या ठिकाणी नव्याने बांधण्यात आलेल्या तळमजला + १ मजल्याच्या बॅडमिंटन हॉल, जलतरण तलाव, योगा हॉल/जिम लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरिता चालविणेस देणेबाबत

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे पेठ हडपसर स.नं.१६४ (पार्ट) येथील विठ्ठलराव तुपे क्रीडा संकुल या ठिकाणी नव्याने बांधण्यात आलेल्या तळमजला + १ मजल्याच्या बॅडमिंटन हॉल, जलतरण तलाव, योगा हॉल/जिम लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरिता चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या तीन निविदाधारकांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे क्र.१ चे निविदाधारक एच टू क्यू अक्वा फन अनलिमिटेड पुल्स पत्ता ५५७/१, शुक्रवार पेठ, पुणे-०२ यांनी देऊ केलेले मासिक भाडे र.रू.१,१८,८९९ (र.रू. एक लाख अठरा हजार आठशे नव्याणव फक्त) मनपाने निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कमेपेक्षा र.रु. ४१,५२८/- ने अधिक दराने त्यांची निविदा स्विकृत करणेस निविदा अटी व शर्तीनुसार निविदादारांनी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमेप्रमाणे ३ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचे सोबत करारनामा करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१११२**

संदर्भ – १) मा. सौ.सोनाली संतोष लांडगे यांचे दि.११/१/२०२० चे पत्र
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.२६९ दि.१४/२/२०२०
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३०५,दि.२७/२/२०२०

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.७ सर्वे नं.२४,फायनल प्लॉट न.५३, पीएमसी कॉलनी, मुंबई–पुणे रोड वाकडेवाडी, पुणे ३ येथे मनपाची वसाहत असून या वसाहतीतील रहिवाशांसाठी पिण्याच्या पाण्याची टाकी आहे. पिण्याच्या पाण्याची टाकी ५० वर्षापूर्वीचे बांधकाम असलेली टाकी आहे. ही टाकी जुनी झालेली असल्याने टाकी पडून दुर्घटना होण्याची शक्यता आहे. तरी या ठिकाणी २४ X ७ या योजना अंतर्गत नवीन टाकी बांधण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१११३**

संदर्भ – १.मा.महापालिका आयुक्त ठ.क्र.६/१२४ दि.१३/०६/२०१७
२.मा.महापालिका आयुक्त ठ.क्र.६/९० दि.२३/०५/२०१८
३.पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचेकडील जा.क्र.पी.एम.पी.एम.एल/स्थावि/२६५९ दि.०७/०८/२०१९ चे पत्र
४. इकडील जा.क्र.माव्य–३६८९ दि.२२/०८/२०१९ चे निवेदन
५.पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचेकडील जा.क्र. पी.एम.पी.एम.एल/स्थावि/४६५६ दि.०२/१२/२०१९ चे पत्र
६. मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१००३,दि. २२/१/२०२० चे पत्र.
७.मा.युवराज बेलदरे व मा.धनराज घोगरे यांचे दि.१४/२/२०२० ची उपसूचना
८.शहर सुधारणा समिती ठराव क्र. २७१ दि.१४/२/२०२०
९. मा.स्थायी समिती ठराव क्र.२३०६,दि.२७/२/२०२०

विषय– बाणेर स.नं.१११ येथील जागा पीएमपीएमएलचे इलेक्ट्रिक बसडेपो विकसित करणेसाठी उपलब्ध करून देणेबाबत

---

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

बाणेर स.नं.१११ (पैकी) येथील एस टी चे आरक्षण असलेली सुमारे १४,३०६ चौमी खुली जागा पुणे महानगर परिवहन महामंडळास इलेक्ट्रिक बसडेपो विकसित करणेसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेकडून रीतसर मागणी होईपर्यंत अथवा ५ वर्षे कालावधी यापैकी कमी कालावधीकरिता मासिक भाडे रक्कम रू.७,९३,९८३/– इतकी आकारणी करून हस्तांतरीत करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

तसेच संदर्भ क्र.७ च्या उपसूचनेनुसार –

सदर ठिकाणी (पास धारकांसाठी)पीएमपीएमएल नागरी सुविधा केंद्र सुरू करणे

## मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र.१११४**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/९६३,दि. १५/१/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२६५, दि.२४/१/२०२०

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०१९ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | टी.डी.आर क्षेत्र चौ.मी. | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे हडपसर स.नं. १११ब/१अ+१ब/१(पै)सि.स.नं.१८१२ (पै) | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे. एलब्रस रियलिटी | सुधारीत नियमावली दि.१५(१)-५ नुसार झोन नाहीत | ३१५०.४१ चौ.मी. (इमारतीसाठी जोते तपासणी पुर्णत्वापोटी २५% टीडीआर बाबत) | ००४५८६ | डिसेंबर २०१९ |

**विषय क्र.१११५**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/९७४,दि. १८/१/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२६६, दि.२४/१/२०२०

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०१९ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | टी.डी.आर क्षेत्र चौ.मी. | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भांबुर्डा टी पी स्कीम नं.१ फा प्लॉ.क्र. ३३६/३ सि.स.नं. ९५३ पैकी वडार वाडी, शिवाजीनगर पुणे | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे. सम्यक गृहनिर्माण प्रा.लि. | बी | ५६२.४७५ चौ.मी. (झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अभि हस्तांतरणपोटी देय १०% टीडीआर) | ००४५५८ | डिसेंबर २०१९ |

**विषय क्र.१११६**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/९७७,दि. १८/१/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२६७, दि.२४/१/२०२०

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे जानेवारी २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे

| अ.क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ उता-यानुसार क्षेत्र | टी.डी.आर क्षेत्र चौ.मी. | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे पुणे महर्षी कर्वेनगर स.नं.१३/१/१ (पै) हिंगणे बुद्रुक सि.स.नं. ५००(पै) | ३६ मी डी पी रस्ता | श्री. समीर देवराम दुधाने | विरळ वस्ती | ९७५.७७ चौ.मी. | २७७.५२ X २.२०= ६१०.५४ | ००५७०८ | जानेवारी २०२० |

**विषय क्र.१११७**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/९९८,दि. २२/१/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२७४, दि.१४/२/२०२०

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे जानेवारी २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ .क्र | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टी.डी.आर क्षेत्र चौ.मी. | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे वडगावखुर्द स.नं.२५/१क/१ | प्लेग्राऊंड (पीजी–२९) | १.साई स्पेस क्रिएटर्स तर्फे भागीदार श्री.अनिल बालकिशन भांगडिया २.आर.आर. इनवेस्टमेंट तर्फे श्रध्दा शैलेश राठी ३. धर्मेद्र मांगीलाल बोथरा ४. विजय नारायणदास सारडा ५. महेश ओमप्रकाश तापडीया | विरळ वस्ती | ८५०.०० चौ.मी. | ८५०.०० चौ.मी.x२.१५ =१८२७.५० चौ.मी. | ००५५४२ | जानेवारी २०२० |

**विषय क्र.१११८**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/९९९,दि. २२/१/२०२० चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२७५, दि.१४/२/२०२०

––––

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०१९ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ .क्र | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/२ उताऱ्या नुसार क्षेत्र | टी.डी.आर क्षेत्र चौ.मी. | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे आंबेगाव खुर्द स.नं. ५/१३(पै) | १२.०० मी.डी.पी रस्ता | मे.एम.जे.कन्स्ट्रक्शन्स तर्फे भागीदार १. श्री कैलास तुकाराम मोरे २. श्री गजानन जगन्नाथ मरळ ३.श्री हनुमंत अंकुश जाधव | विरळ वस्ती | १२०.४५ चौ.मी. | १२०.४५ चौ.मी. X२.२०= २६४.९९ चौ.मी. | ००५५०९ | डिसेंबर २०१९ |

**विषय क्र.१११९**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१०००,दि. २२/१/२०२० चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२७६, दि.१४/२/२०२०

––––

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०१९ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ .क्र | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/२ उताऱ्या नुसार क्षेत्र | टी.डी.आर क्षेत्र चौ.मी. | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे धायरीस.नं. १२८/३/२क/ १(पैकी) | डी पी रस्ता हायस्कूल (एचएस–१०) | निती डेव्हलपर्स तर्फे प्रो.प्रा.अमित विजय भटेवरा | विरळ वस्ती | ५००.०० चौ.मी. | डि. पी.रस्ता ५०.००चौ.मी. हायस्कूल (एचएस–१०)४५०.०० चौ.मी.असे एकूण५००.०० चौ.मीX२.१० =१०५०.०० | ००५७०१ | डिसेंबर २०१९ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | चौ.मी | | |
| २ | स.नं.१२८/३/२क/१/२ (पैकी) | डी पी रस्ता हायस्कूल (एचएस-१०) | निती डेव्हलपर्स तर्फे प्रो.प्रा.अमित विजय भटेवरा | विरळ वस्ती | २००.०० चौ.मी. | डि. पी.रस्ता १९.८१चौ.मी. हायस्कूल (एचएस-१०)१८०.१९ चौ.मी.असे एकूण२००.०० चौ.मी x२.१० =४२०.०० चौ.मी | ००५७०२ | डिसेंबर २०१९ |

**<u>विषय क्र.११२०</u>**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१००२,दि. २२/१/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२७७, दि.१४/२/२०२०

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे जानेवारी २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ .क्र | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टी.डी.आर क्षेत्र चौ.मी. | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे वडगाव बु नवीन स.नं.११/६अ/१ (पैकी)(जुना स.नं. ११,हिस्सा नं.६+७ /१ पैकी) | ३० मी डी पी रस्ता | परेश किरीटकुमार शहा | विरळ वस्ती | ३४०.०० चौ.मी. | २५६.५० चौ.मी. X २.००= ५१३.०० चौ.मी. | ००५६७८ | जानेवारी २०२० |

**<u>विषय क्र.११२१</u>**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१००४,दि. २२/१/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२७८, दि.१४/२/२०२०

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे जानेवारी २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ .क्र | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टी.डी.आर क्षेत्र चौ.मी. | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे घोरपडी स.नं.६७अ/१अ पैकी न.भू.क्र.८१० (पैकी) | १२ मी डी पी रस्ता | रावसाहेब रंगराव पाटील | विरळ वस्ती | ९०.६१ चौ.मी. | ९०.६१ चौ.मी. X२.००=१८१.२२ चौ.मी. | ००५५०३ | जानेवारी २०२० |

**<u>विषय क्र.११२२</u>**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१००५,दि. २२/१/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२७९, दि.१४/२/२०२०

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे जानेवारी २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ .क्र | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टी.डी.आर क्षेत्र चौ.मी. | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे वडगांव खुर्द, स.नं.५२/१ (पैकी) | २४ मी डी पी रस्ता प्लेग्राऊंड (पीजी-४/के) व बसबे | अशोक मुळचंद बोरा | विरळ वस्ती | ३६१५.०० चौ.मी. | ३६१४.१२चौ.मी. X२.००=७२२८. २४ चौ.मी. | | जानेवारी २०२० |
| | | | | | | ३०००.०० चौ.मी. | ००५७०४ | |
| | | | | | | ३०००.०० चौ.मी. | ००५७०५ | |
| | | | | | | १२२८.२४ चौ.मी. | ००५७०६ | |

**विषय क्र.११२३**

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१००६,दि. २२/१/२०२० चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२८०, दि.१४/२/२०२०

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे जानेवारी २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ .क्र | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टी.डी.आर क्षेत्र चौ.मी. | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे बाणेर स.नं. १३४/१ (पैकी) | २४ मी डी पी रस्ता | १.रामहरी लक्ष्मण कळमकर २.वासुदेव लक्ष्मण कळमकर | विरळ वस्ती | १२३०.०० चौ.मी. | ११६४.४६चौ.मी. X२.००= २३२८.९२ चौ.मी. | ००५७०७ | जानेवारी २०२० |

**विषय क्र.११२४**

संदर्भ - १) मा.उमेश गायकवाड व मा.युवराज बेलदरे यांचे दि.१४/२/२०२० चे पत्र

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२८४, दि.१४/२/२०२०

----

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून-

पुणे पेठ मुंढवा स.नं.३८ त्याच प्लॉटमधील डी पी प्रमाणे ६ मी वापरातील रस्ता असून सदर रस्ता अपुरा असल्यामुळे त्याच प्लॉटमधील १२ मी. रस्ता अधिक ६ मी. लागुन असलेला रस्ता असा मिळून त्या रस्त्याची रूंदी १८ मी होणार असल्यामुळे रस्ता मोठा होणार आहे.तरी त्याच पश्चिम भागातील रस्ता शिफ्ट करण्यात यावा.सदरचा प्लॉट हा एकच मालकाचा असल्यामुळे कोणतेही आरक्षण कमी होणार नाही. तरी सदरचा रस्ता हा लवकरात लवकर शिफ्ट करण्यास मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.११२५**

संदर्भ - १) मा. उमेश गायकवाड व मा. अजय खेडेकर यांचे दि.५/११/२०१८ चे पत्र

२) मा. शहर सुधारणा समिती ठ.क्र.२९१ दि.५/११/२०१८

३) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/७६, दि.११/६/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय

४)मा. शहर सुधारणा समिती ठ.क्र.११७ दि.११/०७/२०१९

५)मा.उमेश गायकवाड यांचे दि.१४/२/२०२० यांचे फेरविचाराचे पत्र

६) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२८५, दि.१४/२/२०२०

विषय- पुणे कोरेगाव पार्क कल्याणीनगर येथील स.नं.१९ या ठिकाणी मुस्लिम समाजाच्या कब्रस्तानासाठी जागा आरक्षित आहे परंतु सदरचे आरक्षण हे लोकसंख्येच्या तुलनेने कमी आहे तरी स.नं. ३४ या ठिकाणी मुस्लिम समाजाच्या कब्रस्तानासाठी जागा आरक्षित करणेबाबत.

----

मा.शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून-

शहर सुधारणा समिती ठराव क्र.११७ दि.११.०७.२०१९ चा फेरविचार करण्यात आला.

कल्याणीनगर-मुंढवा-कोरेगाव पार्क येथे मोठा चौक आहे. याठिकाणी जाण्यासाठी फक्त ६ मीटर रूंदीचा रस्ता असल्यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होते. व पार्किंगला जागा शिल्लक राहत नाही. या भागात २ लाखांपेक्षा जास्त मुस्लिम समाजाची लोकवस्ती आहे. या भागातील अनेक मुस्लिम समाजाचे लोक याठिकाणी असलेल्या मस्जिदीमध्ये नमाज पठणासाठी येत असतात. तसेच याठिकाणी मुस्लिम समाजाची दफनभूमी आहे. तरी सदर ठिकाणी वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी सदर ठिकाणी सदरचा रस्ता ९ मीटर रूंदीचा आखण्यास मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप-शहर सुधारणा समिती ठराव क्र.११७ दि.११.०७.२०१९ चा निरस्त करण्यात आला आहे.)

**<u>विषय क्र.११२६</u>**

संदर्भ - १) मा.प्रकाश ढोरे व मा.विजय शेवाळे यांचे दि.१४/२/२०२० चे पत्र

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२८६, दि.१४/२/२०२०

---

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून-

औंध प्रभाग क्र.८ भाऊ पाटील रोड ते महादेव मंदिर ते गणपती विसर्जन घाटावर जाण्यासाठी सर्व्हे नं.२ अ येथून कलम २०५ अन्वये ६.०० मी.रस्ता आखण्यास मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे

**<u>विषय क्र.११२७</u>**

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्र/११०८,दि. १७/२/२०२० चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२९३, दि.२८/२/२०२०

---

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व शिफारस विचारात घेऊन-

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) वर्ग-१ (वेतनश्रेणी १५,६००-३९,१०० + ग्रेड पे रू.६,६००(शासनाप्रमाणे)+ मान्य भत्ते) या पदाची रिक्त पदे तदर्थ पदोन्नतीने भरणेसाठी खातेनिहाय बढती समितीने शिफारस केलेल्या निवड यादीस तसेच शासनाकडील वेळोवेळीचे प्राप्त होणारे आदेश व आस्थापना विषय बाबींचा विचार करून खालील सेवक यांची तदर्थ पदोन्नतीने नेमणूक करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ५३(१) नुसार मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**निवडयादी**

| अ.क्र. | सेवा जे.क्र. | नाव | प्रत्यक्ष जातीचा गट | तदर्थ पदोन्नतीचा गट | शैक्षणिक पात्रता | उप अभियंता पदावरील नेमणूक दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | श्री कुरणे हितेंद्र शामराव | अजा | खुला | बी.ई.(मेकॅ).)<br>पी.जी.डी.एफ.टी | ४.०९.२०१४ |
| २ | ३ | श्री जगताप प्रसाद बाळासाहेब | खुला | खुला | बी.ई (मेकॅ) | ९.१२.२०१६ |

**<u>विषय क्र.११२८</u>**

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१११४,दि. १८/२/२०२० चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२९६, दि.२८/२/२०२०

---

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे फेब्रुवारी २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ .क्र | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टी.डी.आर क्षेत्र चौ.मी. | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे महर्षी कर्वेनगर स.नं.११/३(पैकी) हिंगणे बुद्रुक, सि.स.नं.५४८ (पैकी),५४९ (पैकी)५५० ( पैकी) | ३६.०० मी.डी.पी रस्ता | १.रेखाअशोक नागपूरकर २.रवींद्रअशोक नागपूरकर ३.प्रियाअशोक नागपूरकर | विरळ वस्ती | २१२९ चौ.मी. | १०२१.८६चौ.मी. X२.१५=२१९६. ९९ चौ.मी. | ००५७३५ क्षेत्र १०९८.११ चौ.मी.<br>००५७३६ क्षेत्र १०९८.११ चौ.मी. | फेब्रुवारी २०२० |

**<u>विषय क्र.११२९</u>**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/१११६,दि. १८/२/२०२० चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२९७, दि.२८/२/२०२०

---

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे फेब्रुवारी २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ .क्र | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टी.डी.आर क्षेत्र चौ.मी. | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे बालेवाडी स.नं.१६/१३/१ (पैकी) | ३०.०० मी.डी.पी रस्ता २४.०० मी.डी.पी रस्ता आणि १८.०० मी.डी.पी रस्ता | लिलाबाई विलास बालवडकर, सत्यवान विलास बालवडकर, सुधिर विलास बालवडकर, चैत्राली आदिनाथ हगवणे | विरळ वस्ती | १८०० चौ.मी. | ८५३.१६ चौ.मी. X २.२०= १८७६.९५ चौ.मी. | ००५६७७ | फेब्रुवारी २०२० |

**<u>विषय क्र.११३०</u>**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/११२१,दि. १८/२/२०२० चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२९८, दि.२८/२/२०२०

---

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे फेब्रुवारी २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | क्षेत्र चौ.मी. | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | न.भू.क्र.१४९० (जुना सि.स.नं.९२८)फा प्लॉ.क्र.९२८ अ, कसबा पेठ, कागदीपुरा, पुणे | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.केदार असोसिएटस | सुधारित नियमावली नियम क्र.१५ (१)(५) नुसार झोन नाहीत | ४७४२.१४ चौ.मी. | ००४५८९ | फेब्रुवारी २०२० |

**विषय क्र.११३१**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/११२७,दि. २०/२/२०२० चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२९९, दि.२८/२/२०२०

---

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे फेब्रुवारी २०२० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | क्षेत्र चौ.मी. | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | स.नं. ४६ पैकी,४७ पैकी, सि.स.नं. १७२१,१७२३ ते १७२७ कोथरूड, श्रावणधारा, पुणे | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | किर्तीवर्धन डेव्हलपर्स ॲण्ड बिल्डर्स | सुधारित नियमावली नियम क्र.१५ (१)(५) नुसार झोन नाहीत | २५८५५.०९ चौ.मी.(इमारत सी, डी व ई चे भोगवटा प्रमाणपत्र आदा केले पोटी देय होणारा ३०% टीडीआर) | ००४५९० | फेब्रुवारी २०२० |

**विषय क्र.११३२**

संदर्भ – १) शासन सुचना क्र.टीपीएस/१८१५/२०९/प्र.क्र.६९/१५/ईपी–मंजुरी/नवि–१३ दि.१७/२/२०१८ चे पत्र

२) आयकर विभाग यांचे दि.२९/११/२०१९ रोजीचे पत्र

३) पुणे पेठ हडपसर स.नं.२४९/१ पै हि.नं.१ क या मिळकतीचे मालक श्री तानाजी कवडे यांचे दि.३०/११/२०१९ चे पत्र

४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शआ/८९१,दि. २४/१२/२०१९ चे पत्र

५) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३०२, दि.२८/२/२०२०

विषय– पुणे पेठ हडपसर स.नं.२४९ या सर्व्हे नंबरमधील रस्त्याकरिता असणा–या सारभूत स्वरूपाच्या फेरबदलांना (EP) अंतिम मंजुरी देणेबाबत

---

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

मे. शासनाने एमआरटीपी ॲक्ट ३१(१) अन्वये (EPR-38) मध्ये नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये पुणे पेठ हडपसर स.नं.२४९/१ पै हि.नं.१ अ व १ ब या मिळकतीमधील ६.०० मी. रूंदीचा अंतर्गत रस्ता तसेच पुणे पेठ हडपसर स.नं.२४९/१ पै हि.नं.१ क येथील ६.०० मी रूंदीची जागा एकत्रित करून १२.०० मी रूंदीचा जोडलेल्या नकाशात ए, बी, सी, डी हयाप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये आखणेस व त्याप्रमाणे मे. महाराष्ट्र शासन यांना कळविण्यास मान्यता दयावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.११३३**

संदर्भ – १) मा.मुख्य सभा ठराव क्र.३३०,दि.३०/०९/२०१८

२) कार्यालयीन आदेश,जा.क्र.मआ/कलम/२०५/३०९,दि.२७/०३/२०१७

३) विषयांकित बाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये कारवाई करणेस दिलेले जाहीर प्रकटन१/७०७ दि.६/१/२०१८

४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/१२, दि.१३/४/२०१८ चे पत्र

५) शहर सुधारणा समिती ठराव क्र.३१ दि.२०.०४.२०१८

६) मा.अमोल बालवडकर अध्यक्ष, शहर सुधारणा समिती व मा.सौ.हर्षाली माथवड यांचे दि.२७/२/२०२० चे फेरविचाराचे पत्र

७) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३०४, दि.२८/२/२०२०

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

शहर सुधारणा समिती ठराव क्र.३१ दि.२०.०४.२०१८चा फेरविचार करण्यात आला.

पुणे महानगरपालिकेच्या मान्य विकास आराखडयातील बालेवाडी, स.नं.४२,४३,४४,४५ व ४७ दरम्यानचा २४.० मी.डी.पी.रस्ता व त्यापुढे मुळा नदीवर पिंपरी–चिंचवड महानगरपालिका हद्द व पुणे महानगरपालिका हद्द या दरम्यान बांधण्यात आलेल्या पुलाच्या आखणीशी २४.० मी.डी.पी.रस्ता सुसंगत नसल्याने आणि नविन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये आखण्यात आलेल्या रस्त्याच्या आखणीच्या अनुषंगाने, २४ मी.रस्त्याच्या आखणीअंतर्गत येत असलेले क्षेत्र मुळा नदीकाठच्या ३० मी.रस्त्यापर्यंत निवासी भागात व ३० मी रस्त्यानंतर रिव्हर प्रोटेक्शन बेल्ट या आरक्षण क्षेत्रात बदल करण्यास त्याचप्रमाणे बालेवाडी येथील एचडीएच–१ हे आरक्षणाच्या क्षेत्रात नवीन ३० मी रस्त्याच्या आखणीमुळे घट होवून सदर क्षेत्र २४५००.०० चौ.मी.ऐवजी २४२००.०० चौ.मी.अशाप्रमाणे बदल करण्यास गौण फेरबदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(२) मे. शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास मान्यता दयावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप–शहर सुधारणा समिती ठराव क्र.३१ दि.२०.०४.२०१८ चा निरस्त करण्यात आला आहे.)

## मा.महिला व बाल कल्याण समितीचे ठराव

**विषय क्र.११३४**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्र/६३१,दि.७/१०/२०१९ चे पत्र.
२) मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.११९, दि. १३/२/२०२०

––––

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

श्रीमती मिलन बबन कर्डीले, उपशिक्षिका जि.प.प्रा.शाळा वाकी खुर्द ता.खेड,जि.पुणे यांची पती – पत्नी एकत्रीकरण अंतर्गत एकतर्फी बदलीने यांना पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्राथमिक शिक्षण विभागाकडे रिक्त असलेल्या सह.शिक्षिका या पदावर बदलीने नियुक्ती करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.११३५**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्र/६६३,दि.३०/१०/२०१९ चे पत्र.
२) मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.१२०, दि. १३/२/२०२०

––––

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पती–पत्नी एकत्रीकरण अंतर्गत, एकतर्फी बदलीने श्रीमती चित्राली गावडे, श्रीमती दिपाली मासळकर, श्रीमती प्रिती व्होरकाटे व श्रीमती शुभांगी भालेराव, उपशिक्षिका यांची पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्राथमिक शिक्षण विभागाकडे रिक्त असलेल्या प्राथमिक शिक्षक या पदावर बदलीने नियुक्ती करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र.११३६**

संदर्भ – मा.राजेंद्र शिळीमकर व मा.सुनिल कांबळे, आमदार यांची सूचना दि.१३/११/२०१९

––––

लोकशाहिर आण्णाभाऊ साठे स्मारक येथील लोकशाहिर आण्णाभाऊ साठे यांचे जीवनावरील शिल्पचित्राचे उद्घाटन दि.२०.११.२०१९ रोजी रा.स्व.संघाचे अखिल भारतीय सरकार्यवाह मा.भैय्याजी जोशी यांचे शुभहस्ते व मा.बाबा कल्याणी, चेअरमन,भारत फोर्ज लि.पुणे यांचे प्रमुख उपस्थितीत व पुणे शहरातील सर्व खासदार, आमदार, पक्षनेते,गटनेते यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात यावे.

सदर कार्यक्रमाच्या आयोजनाचे सर्व अधिकार मा.महापौर यांना देण्यात यावेत.

**विषय क्र.११३७**

संदर्भ – मा.सौ.मंजुषा नागपुरे यांची सूचना दि.१८/११/२०१९

––––

प्रभाग क्र.३४ मधील वडगाव बु.येथील कॅनॉल लगत असलेल्या कै.शांताबाई एकनाथ चरवड उद्यानाचे उद्घाटन मा.श्री.गिरीषजी बापट साहेब. खासदार, पुणे शहर यांच्या शुभहस्ते व स्थानिक आमदार मा.श्री.भिमराव अण्णा तापकीर,आमदार खडकवासला मतदार संघ,पुणे यांच्या उपस्थिती मध्ये व मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली करण्यात यावे.

**विषय क्र.११३८**

संदर्भ – मा.योगेश ससाणे व मा.ॲड.हाजी गफूर पठाण यांची सूचना दि.२६/११/२०१९

----

हडपसर हे पुणे शहराचे पूर्व बाजूचे प्रवेशद्वार आहे. या गावास अनेक वर्षाचा इतिहास आहे. पुणे शहर हे सांस्कृतिक शहर असून छत्रपती शिवाजी महाराजांचे पुण्यामध्ये वास्तव्य होते. सबब हडपसर गावाच्या वेशीवर म्हणजेच पुणे शहराचे पूर्व बाजूचे प्रवेशद्वारावर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा शासनाच्या धोरणाप्रमाणे बसविण्यात यावा.

**विषय क्र.११३९**

संदर्भ – मा.प्रकाश कदम यांची सूचना दि.१३/१२/२०१९

----

प्रभाग क्र.३८ मधील कात्रज सातारा रोड गुजरवाडी फाटा ते स.नं.४५ कात्रज हद्दीपर्यंत १८ मी.डी.पी.रस्ता विकसित करणे या कामाचे भूमीपूजन मा.अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते करण्याचे आयोजिले आहे. तरी या सर्व कार्यक्रमाचे अधिकार मा.महापौर यांना देण्यात यावे.

**विषय क्र.११४०**

संदर्भ – मा.सौ.स्मिता कोंढरे यांची सूचना दि.१९/१२/२०१९

----

पुणे महानगरपालिकेतर्फे कै.श्रीमती रखमाबाई तुकाराम थोरवे प्राथमिक आरोग्य केंद्राचे उद्घाटन शुक्रवार दि.२७ डिसेंबर २०१९ रोजी सायंकाळी ५.३० ( साडेपाच ) वाजता मा.संजय चंदूकाका जगताप,आमदार यांचे शुभहस्ते व मा.मुरलीधर मोहोळ,महापौर यांचे प्रमुख उपस्थितीत व मा.ना.प्रकाश जावडेकर, केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री, मा.डॉ.नीलम गोऱ्हे ,उपसभापती,विधानपरिषद व आमदार, मा.गिरीश बापट,खासदार, मा.ना.प्रदीप रावत, अध्यक्ष, नॅशनल शिपींग बोर्ड यांचे विशेष उपस्थितीत तसेचमा.सौ.सुप्रिया सुळे,खासदार, मा.डॉ.अमोल कोल्हे,खासदार, मा. ॲड्. सौ. वंदना चव्हाण, खासदार, मा.संजय काकडे,खासदार, मा.चंद्रकांत पाटील, आमदार, मा.माधुरी मिसाळ, आमदार, मा.भीमराव तापकीर,आमदार , मा.सौ.मुक्ता टिळक, आमदार, मा.सुनिल कांबळे, आमदार, मा.चेतन तुपे, आमदार, मा.सुनिल टिंगरे, आमदार, मा.सिध्दार्थ शिरोळे, आमदार, मा. अनिल शिवाजीराव भोसले, आमदार, मा. शरद रणपिसे, आमदार, मा. अनंतराव गाडगीळ, आमदार, तसेच मा.हेमंत रासने,अध्यक्ष, स्थायी समिती, मा.धीरज घाटे,सभागृहनेते, मा.दिलीप बराटे,विरोधी पक्षनेते,मा.अरविंद शिंदे, पक्षनेते,कॉंग्रेस,मा.पृथ्वीराज सुतार, पक्षनेते,शिवसेना,मा.वसंत मोरे,पक्षनेते महाराष्ट्र नवनिर्माणसेना व स्थानिक नगरसेवक ,मा.सौ.अश्विनी लांडगे,पक्षनेत्या,ए.आय.एम.आय.एम.,मा.सौ.सुनिता वाडेकर,पक्षनेत्या,आर.पी.आय., मा.अमोल बालवडकर, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती ,मा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे,अध्यक्षा,महिला व बाल कल्याण समिती, मा.योगेश समेळ,अध्यक्ष,विधी समिती, मा.विजय शेवाळे,अध्यक्ष, क्रीडा समिती,मा.राजेश येनपुरे, अध्यक्ष नांव समिती,मा.किरण दगडे पाटील,अध्यक्ष,जैवविविधता व्यवस्थापन समिती,मा.युवराज बेलदरे,अध्यक्ष, धनकवडी–सहकारनगर प्रभाग समिती,मा.अमृता बाबर,स्थानिक नगरसेविका, मा.स्मिता कोंढरे,स्थानिक नगरसेविका, इत्यादी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आला, त्यास पश्चात मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्र.११४१**

संदर्भ – मा.सचिन दोडके व मा.बाळाभाऊ उर्फ किशोर धनकवडे यांची सूचना दि.३०/१२/२०१९

----

महाराष्ट्र मध्ये विविध प्रकारचे समाजउपयोगी कार्य करून समाजाला नवी दिशा देण्याचे काम करणारे व मोठया प्रमाणात स्वच्छता व आरोग्य शिबीर घेऊन समाज उपयोगी काम करणारे मा.तिर्थरूप डॉ.श्री.नारायण तथा नानासाहेब धर्माधिकारी यांची प्रतिमा पुणे महानगरपालिकेत शासनाच्या धोरणानुसार लावण्यात यावी.

**विषय क्र.११४२**

संदर्भ – मा.पृथ्वीराज सुतार यांची सूचना दि.३/१/२०२०

----

प्रभाग क्र.१२ड,मधील शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे कलामंदिराचा ( बालनाटयगृह) उद्घाटन समारंभ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री.उध्दवसाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते करण्यात यावा. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकनेते खासदार मा.श्री.शरदचंद्रजी पवार तसेच महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्षनेते मा.श्री.देवेंद्रजी

फडणवीस,महाराष्ट्र राज्याचे मंत्री मा.श्री.बाळासाहेब थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत व शिवसेनेचे संसदीय नेते खासदार मा.श्री.संजयजी राऊत, खासदार मा.श्री.गिरीष बापट,शिवसेना सचिव खासदार मा.श्री.अनिलजी देसाई, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती मा.नीलमताई गोऱ्हे आमदार मा.श्री.चंद्रकांत पाटील,महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री शिवसेना उपनेते मा.श्री.शशिकांतभाऊ सुतार, शिवसेना संपर्क प्रमुख मा.श्री.बाळाभाई कदम, महापौर मा.श्री मुरलीधर मोहोळ व स्थानिक नगरसेवक यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात यावा.

**विषय क्र.११४३**

संदर्भ – मा.दिलीप बराटे,विरोधी पक्षनेते, मा.सुनिल कांबळे,आमदार, मा.दत्तात्रय धनकवडे , मा.दिलीप वेडेपाटील व मा.दिपक पोटे यांची सूचना दि.१४/१/२०२०

----

डॉ.पी.डी.पाटील, कुलपती,डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठ, पुणे हे गेली ३६ वर्षे पुण्यातील शिक्षण, आरोग्य, साहित्य , सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात सक्रीयपणे कार्यरत आहेत. शिक्षण,आरोग्य आणि साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रात त्यांनी पुण्याचा लौकिक भारतभर वाढविला.डॉ.पी.डी.पाटील यांना त्यांच्या या कार्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक पुरस्कार मिळाले आहेत. शिक्षण,आरोग्य,साहित्य,सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या आजवरच्या या अजोड कार्याची दखल घेवून पुणे महानगरपालिकेतर्फे त्यांचा मानपत्र देवून खास सत्कार करण्यात यावा.

**विषय क्र.११४४**

संदर्भ – मा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे व मा.सौ.मनिषा लडकत यांची सूचना दि.२२/१/२०२०

----

पुण्याच्या आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुलाचे प्रमुख व अर्जुन पुरस्कार विजेते पै.श्री.काका पवार यांनी कुस्ती खेळासाठी आजपर्यंत दिलेल्या योगदानाबद्दल पुणे महानगरपालिकेच्या वतीने त्यांचा मानपत्र देऊन खास सत्कार करण्यात यावा. तसेच सर्व अधिकार मा.महापौर यांना देण्यात यावे.

**विषय क्र.११४५**

संदर्भ – मा.सौ.नंदाताई लोणकर, मा.अशोक कांबळे, मा.प्रमोद भानगिरे व मा.सौ.प्राची आल्हाट यांची सूचना दि.२४/१/२०२०

----

पुणे महानगरपालिकेतर्फे प्रभाग क्र.२६ कोंढवा खुर्द येथे नव्याने विकसित करण्यात आलेल्या (४.५ कि.मी.लांबीच्या ) जलवाहिनीचा उद्घाटन समारंभ आणि श्री गुरूनानक देवजी उद्यानाचा लोकार्पण सोहळा सोमवार दि.९ मार्च २०२० रोजी सायंकाळी ५.०० ( पाच ) वाजता मा.ना.अजितदादा पवार,उपमुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, पुणे जिल्हा यांचे शुभहस्ते व मा.ना.प्रकाश जावडेकर, केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री, मा.डॉ.नीलम गोऱ्हे ,उपसभापती,विधानपरिषद व आमदार, मा.गिरीश बापट,खासदार, मा.ना.प्रदीप रावत, अध्यक्ष, नॅशनल शिपींग बोर्ड यांचे विशेष उपस्थितीत तसेच मा.डॉ.अमोल कोल्हे,खासदार, मा.सौ.सुप्रिया सुळे,खासदार, मा. ॲड्. सौ. वंदना चव्हाण, खासदार, मा.संजय काकडे,खासदार, मा.चेतन तुपे,आमदार, मा.चंद्रकांत पाटील, आमदार, मा.माधुरी मिसाळ, आमदार, मा.भीमराव तापकीर,आमदार , मा.सौ.मुक्ता टिळक, आमदार, मा.सुनिल कांबळे, आमदार, मा.सुनिल टिंगरे, आमदार, मा.सिध्दार्थ शिरोळे, आमदार, मा.संजय जगताप, आमदार, मा. अनिल शिवाजीराव भोसले, आमदार, मा. शरद रणपिसे, आमदार, मा. अनंतराव गाडगीळ, आमदार, तसेच मा.सौ.सरस्वती शेंडगे, उपमहापौर, मा.हेमंत रासने,अध्यक्ष, स्थायी समिती, मा.धीरज घाटे,सभागृहनेते, मा.दिपाली धुमाळ,विरोधी पक्षनेत्या,मा.अरविंद शिंदे, पक्षनेते,कॉंग्रेस,मा.पृथ्वीराज सुतार, पक्षनेते,शिवसेना,मा.वसंत मोरे,पक्षनेते महाराष्ट्र नवनिर्माणसेना,मा.सौ.अश्विनी लांडगे,पक्षनेत्या,ए.आय.एम.आय.एम.,मा.सौ.सुनिता वाडेकर,पक्षनेत्या,आर.पी.आय., मा.अमोल बालवडकर, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती ,मा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे,अध्यक्षा,महिला व बाल कल्याण समिती, मा.योगेश समेळ,अध्यक्ष,विधी समिती, मा.विजय शेवाळे,अध्यक्ष, क्रीडा समिती,मा.राजेश येनपुरे, अध्यक्ष नांव समिती,मा.किरण दगडे पाटील,अध्यक्ष,जैवविविधता व्यवस्थापन समिती,मा.सौ.पुजा कोद्रे,अध्यक्षा, हडपसर–मुंढवा प्रभाग समिती,मा.प्रमोद भानगिरे,स्थानिक नगरसेविक, मा.सौ.नंदा लोणकर,स्थानिक नगरसेविका, मा.संजय घुले,स्थानिक नगरसेवक इत्यादी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आला, त्यास पश्चात मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्र.११४६**

संदर्भ – मा.सौ.नंदाताई लोणकर, मा.प्रमोद भानगिरे व मा.सौ.प्राची आल्हाट यांची सूचना दि.३/२/२०२०

----

पुणे महानगरपलिकेतर्फे प्रभाग क्र.२६ कोंढवा खुर्द येथे नव्याने विकसित करण्यात आलेल्या (४.५ कि.मी.लांबीच्या ) जलवाहिनीचा उद्घाटन समारंभ आणि श्री गुरूनानक देवजी उद्यानाचा लोकार्पण सोहळा सोमवार दि.९ मार्च २०२० रोजी सायंकाळी ५.०० ( पाच ) वाजता मा.ना.अजितदादा पवार,उपमुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, पुणे जिल्हा यांचे शुभहस्ते व मा.ना.प्रकाश जावडेकर, केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री, मा.डॉ.नीलम गोऱ्हे ,उपसभापती,विधानपरिषद व आमदार, मा.गिरीश बापट,खासदार, मा.ना.प्रदीप रावत, अध्यक्ष, नॅशनल शिपींग बोर्ड यांचे विशेष उपस्थितीत तसेच मा.डॉ.अमोल कोल्हे,खासदार, मा.सौ.सुप्रिया सुळे,खासदार, मा. ॲड्. सौ. वंदना चव्हाण, खासदार, मा.संजय काकडे,खासदार, मा.चेतन तुपे,आमदार, मा.चंद्रकांत पाटील, आमदार, मा.माधुरी मिसाळ, आमदार, मा.भीमराव तापकीर,आमदार , मा.सौ.मुक्ता टिळक, आमदार, मा.सुनिल कांबळे, आमदार, मा.सुनिल टिंगरे, आमदार, मा.सिध्दार्थ शिरोळे, आमदार, मा.संजय जगताप, आमदार, मा. अनिल शिवाजीराव भोसले, आमदार, मा. शरद रणपिसे, आमदार, मा. अनंतराव गाडगीळ, आमदार, तसेच मा.सौ.सरस्वती शेंडगे, उपमहापौर, मा.हेमंत रासने,अध्यक्ष, स्थायी समिती, मा.धीरज घाटे,सभागृहनेते, मा.दिपाली धुमाळ,विरोधी पक्षनेत्या,मा.अरविंद शिंदे, पक्षनेते,काँग्रेस,मा.पृथ्वीराज सुतार, पक्षनेते,शिवसेना,मा.वसंत मोरे,पक्षनेते महाराष्ट्र नवनिर्माणसेना,मा.सौ.अश्विनी लांडगे,पक्षनेत्या,ए.आय.एम.आय.एम.,मा.सौ.सुनिता वाडेकर,पक्षनेत्या,आर.पी.आय., मा.अमोल बालवडकर, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती ,मा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे,अध्यक्षा,महिला व बाल कल्याण समिती, मा.योगेश समेळ,अध्यक्ष,विधी समिती, मा.विजय शेवाळे,अध्यक्ष, क्रीडा समिती,मा.राजेश येनपुरे, अध्यक्ष नांव समिती,मा.किरण दगडे पाटील,अध्यक्ष,जैवविविधता व्यवस्थापन समिती,मा.सौ.पुजा कोद्रे,अध्यक्षा, हडपसर–मुंढवा प्रभाग समिती,मा.प्रमोद भानगिरे,स्थानिक नगरसेविक, मा.सौ.नंदा लोणकर,स्थानिक नगरसेविका, मा.संजय घुले,स्थानिक नगरसेवक इत्यादी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आला, त्यास पश्चात मान्यता देण्यात येत आहे.

**( टिप – विषय क्र.११३६ ते ११४६ हे दि. १०/२ /२०२० रोजी मा.पक्षनेते सभेत फेरफारासह मान्य झालेले आहेत.)**

**विषय क्र.११४७**

संदर्भ :- मा. धनराज घोगरे व मा.राजेश येनपुरे यांची सूचना दि.२८/२/२०२०

१) मा.शिवाजी केदारी व मा.सुधीर जानजोत यांचे दि.१४.१२.९३ चे पत्र

२) मा.शिवाजी केदारी व मा.अभय छाजेड यांचे दि.१४.६.९४ चे पत्र.

३) मा.सौ.भावना केदारी व मा.रामदास पवार यांचे दि.१७.६.९७ चे पत्र.

४) शहर सुधारणा समिती ठ.क्र.(१)११४०,दि.१६.१२.९३(२) १३१,दि.२३.६.९४ (३) ९३,दि.१९.६.९७

५) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पत्र क्र.मआ–नअ–वियो–२४८,दि.२५.५.२००० ने पाठविलेला अभिप्राय

६) शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२२,दि.१४.७.२०००

----

१) वानवडी स.नं.६२, हि.नं.७,८ मधून २० फुटांचा रस्ता आखण्याचा ठराव आहे. जागेवर हिश्श्यांचे मध्य भागातील ३० फुट रस्त्याचे पूर्वेस श्री.बिलाल मिस्त्री यांची जागा आहे. मिस्त्री यांचे जागेत पूर्वेकडे गुंठेवारी पध्दतीची बांधकामे झालेली आहे. तेथील रहिवासियांनी वर नमूद केल्याप्रमाणे १० ते १२ फुटाची जागा सामाईक रस्त्यासाठी मोकळी जोडलेली आहे. या रिहवासियांना रस्ता मिळणे आवश्यक आहे. मूळ ठरावात नमूद केल्याप्रमाणे हिश्याचे मध्यभागातून रस्ता आखावयाचा झाल्यास श्री.मिस्त्री यांनी प्रथमच पासूनच अशा रस्त्याच्या आखणीस विरोध केल्यास्तव मिस्त्री यांनी सुचविल्याप्रमाणे त्यांचे जागेच्या दक्षिणेकडील १० फुट जागा रस्त्यासाठी त्यांनी मोकळी सोडली आहे. त्यांचे जागेतून दक्षिण उत्तर असा ( चॅम्पर) हा आखावा लागणार आहे. श्री.मिस्त्री यांचे पूर्वेकडील जागेतील गुंठेवारी पध्दतीची बांधकामातील सुटलेल्या जागेचाही सामाईक रस्त्याची रूंदी ही.डी.सी.रूल नियम क्र.१२.३ नुसार मिळत नसल्याने त्या भागात रस्ता आखणे संयुक्तिक होणार नाही. यास्तव सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे अ, ब.ब–१ आद्याक्षराप्रमाणे दर्शविल्यानुसार २० फुट रूंदीचा रस्ता आखणे योग्य होईल.

२) वानवडी स.नं.६२,हि.नं.६ मध्येही गुंठेवारी पध्दतीची बांधकाम असून तेथेही सामाईक रस्त्यासाठी सुटलेली जागाही १० ते १२ फुट इतकीच आहे. डी.सी.रूल क्र.नियम क्र.१२ नुसार सामाईक रस्त्यासाठी सुटलेली जागा ही रूंदीपात्र ठरत नसल्याने याही हिश्यात पुरेशी रूंदी अभावी रस्त्याची आखणी करणे संयुक्त होणार नाही.

३) वानवडी स.नं.६२, हि.नं.१ ते १२ मध्येही दक्षिण-उत्तर अशीच गुंठेवारी पध्दतीची बांधकामे असून तिथेही १० ते १२ फुट सामाईक रस्त्यासाठी जागा सुटलेली आहे. डी.सी.रूल नियम क्र.१२.३ नुसार रस्त्याच्या रूंदी मिळत नसल्याने रस्ता आखणे संयुक्तिक होणार नाही.

तरी वानवडी स.नं.६२, हि.नं.७-८ मधून मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात अ-ब-ब१ या आद्याक्षराने दर्शविल्याप्रमाणे २० फुट रूंदीचा रस्ता आखणेस मान्यता देण्यात येत आहे.

असा मनपा ठराव क्र.२२०, दिनांक२४/८/२००० चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ :-
१) मा.शिवाजी केदारी व मा.सुधीर जानजोत यांचे दि.१४.१२.९३ चे पत्र
२) मा.शिवाजी केदारी व मा.अभय छाजेड यांचे दि.१४.६.९४ चे पत्र.
३) मा.सौ.भावना केदारी व मा.रामदास पवार यांचे दि.१७.६.९७ चे पत्र.
४) शहर सुधारणा समिती ठ.क्र.(१)११४०,दि.१६.१२.९३(२) १३१,दि.२३.६.९४ (३) ९३,दि.१९.६.९७
५) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पत्र क्र.मआ-नअ-वियो-२४८,दि.२५.५.२००० ने पाठविलेला अभिप्राय
६) शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२२,दि.१४.७.२०००

----

वानवडी स.नं.६२, हि.नं.७-८ मधून मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात अ-ब-ब१ या आद्याक्षराने दर्शविल्याप्रमाणे २० फुट रूंदीचा रस्ता आखावा असे दर्शविलेले आहे. परंतु 'अ' आद्याक्षराने दर्शविलेला रस्ता हा रद्द करण्यात यावा.कारण सदर ठिकाणी पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. त्यामुळे मा.महा.आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या नकाशात 'ब-ब१' या आद्याक्षराने दर्शविलेला रस्ता २० फुट रूंदीचा आखण्यात यावा.

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :-६/३/२०२०.

**सुनील पारखी**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**